



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले



प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर



बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | रविवार २४ नोव्हेंबर २०२४ | अंक ३५० ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


# धनंजय मुंडे लाखात एक; परळीत राजेसाहेब देशमुखांचा सुपडासाफ

## धनुभाऊ लाखात एक

विधानसभा निवडणुकीत राज्याचे लक्ष लागलेल्या परळी मतदारसंघात कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी आपले गड राखत तब्बल १ लाख ३८ हजार ४८१ मतांची आघाडी घेऊन एकतर्फी विजय मिळवून विरोधी उमेदवार राजेसाहेब देशमुख यांचा धुवा उडविला असल्याने धनु भाऊ लाखात एक अशी प्रतिक्रिया व्यक्त करण्यात येत आहे.





## गेवराईत विजय पर्व



गेवराई विधानसभा मतदारसंघात युतीकडून विजयसिंह पंडित, आघाडी बदामराव पंडित, अपक्ष लक्ष्मण पवार, वंचित आघाडी प्रियंका खेडकर अशी चौरंगी लढत झाली. या लढतींमध्ये विजयसिंह पंडित यांनी सुरवातीपासून आघाडी घेतली होती. ती शेवटपर्यंत वाढत गेली विरोधकांना धोबीपछाड करीत १ लाख १५ हजार ८५१ मते घेऊन ४२ हजार ३३२ मतांनी विजयसिंह पंडित विजयी ठरले आहेत. गेवराईकरांनी एका अभ्यासु अन् विकासाचे व्हिजन असलेल्या तरुण नेत्याला प्रतिनिधी म्हणून कौल दिला. विजयसिंह पंडित विजयी होताच कार्यकर्त्यांनी गेवराई, बीड येथे आनंद साजरा केला.

## परळी,गेवराई,आष्टी मतदारांचा एकतर्फी कौल

## केज, माजलगाव, बीडमध्ये काटे की

## परळीच्या माय बाप जनतेचे आभार : मुंडे

## संदीप लढा भी जिता भी ५ हजार मतांनी विजय

बीड विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडी कडून संदीप क्षीरसागर, महायुती कडून डॉ. योगेश क्षीरसागर हे दोघे भाऊ आमनेसामने होते. यामुळे येथील लढतीकडे महाराष्ट्राचे लक्ष लागले होते. या दोघां भावांमध्ये काटे की टक्कर पहाण्यास मिळाली. शेवटपर्यंत मतमोजणी मध्ये ते मागेपुढे होत असल्याने विजय कोणाचा होणार याची उत्सुकता लागली होती. अखेर २९ व्या फेरीची मतमोजणी पूर्ण झाली आणि संदीप क्षीरसागर ५ हजार ३२८ मतांची आघाडी घेत विजयी ठरले आहेत. संदीप क्षीरसागर विजयी झाल्याची बातमी धडकताच कार्यकर्त्यांनी आनंद साजरा केला. या निवडणुकीत संदीप क्षीरसागर हे एकटेच निवडणुकीत खिंड लढवित होते. यामुळे लढा...भी ...और जिता ...भी अशी प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. तर संदीप क्षीरसागर यांनी मी एकाटाच बास असे म्हटले होते अन् त्यांनी ते खरे ठरविले

## आष्टीत फक्त सुरेश धसच



आष्टी विधानसभा मतदारसंघात सुरेश धस, भीमराव धोंडे, शेख महेबुब, बाळासाहेब आजबे अशी चौरंगी लढत झाली. तसेच येथे युतीचे दोन उमेदवार असल्याने मैत्रीपूर्ण लढत झाली. या सर्वांना मात करुन भाजपाचे उमेदवार सुरेश धस मतमोजणीच्या सुरवातीपासून आघाडीवर होते. शेवटपर्यंत त्यांना रोखण्यात कोणत्याही उमेदवाराला यश आले नाही. त्यांची लीड वाढतच गेली आणि त्यांनी ७० हजार पेक्षा जास्त मतांची आघाडी घेऊन विजयी खेचून आणला. आष्टीच्या मतदारांनी सुरेश धस यांना एकतर्फी कौल दिल्याचे मतमोजणी तून दिसून आले. चौरंगी लढतीतही तब्बल ७० हजारांपेक्षा जास मताधिक्य घेऊन विजय मिळविल्याने आष्टीत सुरेश धसच किंग असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.

## नमितातार्ई फिरसे



कैज : विधानसभा निवडणुकीत आ. नमिता मुंदडा, पृथ्वीराज साठे अशी सरळ लढत झाली. अत्यंत विजयी चुरशीची लढत ठरली असून शेवटपर्यंत कोण बाजी मारणार याचा अंदाज येत नव्हता पण थोडी-थीडी आघाडी घेत आ. नमिता मुंदडा या विजयी ठरल्या असून, यानंतर नागरिकांनी पुन्हा मार्ग प्रगतीचा म्हणून स्वागत केले. केज मतदारसंघात आ. नमिता मुंदडा, पृथ्वीराज साठे अशी सरळ लढत झाली. यामध्ये सर्व प्रमुख नेते अन् कार्यकर्ते मुंद-डांच्या विरोधात होते. परंतु आ. नमिता मुंदडा यांनी मागील ५ वर्षात मतदारसंघात जवळपास ३ हजार कोटींची विकासकामे केली. या कामामुळे सामान्य मतदार मात्र विकासाच्या मुद्यावर मुंदडांच्या पाठीमागे उभा होता आणि आहे हे निकालातून स्पष्ट झाले आहे. या चुरशीच्या लढतीत जवळपास ३ हजार पेक्षा अधिक मतांची आघाडी घेऊन नमिता मुंदडा या विजयी झाल्या आहेत.

## ज्या डोंगरपट्ट्याला प्रकाश सोळंके यांनी टाळलं त्याच डोंगरपट्ट्यांनी प्रकाश सोळंके यांना तारलं..!



माजलगाव मतदारसंघात जिल्ह्यात सर्वाधिक ३४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. परंतु येथे चौरंगी लढत मतमोजणीत दीसून आले. अपक्ष उमेदवार रमेश आडसकर, माधव निर्मळ यांनी चांगली मते मिळविली पण खरी लढत युतीचे प्रकाश सोळंके आणि आघाडीचे मोहन जगताप यांच्यात काटे की, टक्कर दिसून आली. प्रथम दोन फेरीत प्रकाश सोळंके यांना लीड होती. त्यानंतर सोळंकेंना मागे सारत मोहन जगताप लीडवर आले. ही लीड २०,२१ फेरीपर्यंत सोळंकेंना तोडता आली नाही. परंतु यानंतर प्रकाश सोळंके यांनी मुसांडी घेत मोहन जगताप यांना मागे टाकले, ते शेवटपर्यंत आघाडीवर राहिले अन् विजयी ठरले. विशेष म्हणजे या निवडणुकीत त्यांची बऱ्याच जणांनी साथ सोडल्याने त्यांची जागा धोक्यात माणली जात होती पण शेवटच्या क्षणाला त्यांनी बाजी मारल्याचे माजलगावात सोळंकेच मदादाफ असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
रविवार २४ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# आताही असेच काही घडले तर?

किंगमेकरफ ठरतील का, नवे सरकार कोणाचेही आले तरी अजित पवार त्यात असतील का, एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले नाहीत तर काही वेगळा निर्णय घेतील का, असे प्रश्नोपनिषद सध्या सुरू आहे. मागच्या निवडणुकीत भाजप आणि शिवसेना यांची निवडणूकपूर्व आघाडी होती, मात्र निकालानंतर ठाकरेंनी भाजपला ङ्गजय महाराष्ट्रफ केले. आताही असेच काही घडले तर? एक नक्की, की निकालाचा अंदाज येत नाही. लोक भांबावलेले आहेत. ङ्गएक्झिट पोलफ आल्यावर तर गोंधळ जास्तच वाढला! लोकसभा निवडणुकीत संविधान आणि गद्दारी हे दोन मुद्दे प्रमुख होते. विधानसभा निवडणुकीत संविधानाचा मुद्दा फार चालणार नव्हताच, पण गद्दारी हा अगदी राज्याचा मुद्दाही या निवडणुकीत फारसा दिसला नाही. पक्षांची तोडफोड लोकांना न आवडल्यामुळे शरद पवार – उद्धव ठाकरे यांच्याविषयी सहानुभूती तयार झाली हे खरे असले तरी ते काही या निवडणुकीचे ङ्गनॅरेटिव्हफ होऊ शकले नाही. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडी आक्रमक होती, तर महायुती बचावाच्या स्थितीत. या निवडणुकीत ङ्गलाडकी बहीणफच्या मुद्द्याने बराच अवकाश व्यापला. तरीही तीन ङ्गसीफ्वर या निवडणुकीत चर्चा झाली. कास्ट, क्रॉप आणि कॅश! जातीवर ही निवडणूक लढवली गेली. सोयाबीनसह इतर शेतमालाच्या भावाचा मुद्दा पुढे आला. ङ्गकॅशफ अर्थात बहिणींच्या खात्यात जमा झालेले पैसे आणि निवडणुकीत वाटले गेलेले पैसे यावर बरीच चर्चा झाली. प्रत्यक्षात मतदारांच्या मनात काय आहे, याचा अंदाज मात्र आलेला नाही. जिथे हरियाणासारख्या छोट्या राज्यातले अंदाज चुकतात, तिथे महाराष्ट्रासारख्या एवढ्या मोठ्या आणि वैविध्य असलेल्या राज्याबाबत आडाखे बांधणे आणखी कठीण. या निवडणुकीत मतांची टक्केवारी वाढल्याने हा अधिकचा टक्का कोणाच्या फायद्याचा याविषयीची उत्कंठा कायम आहे. मुळात ही निवडणूकच अभूतपूर्व. मुख्यमंत्रिपदाचा दावा करू शकतील, असे सहा प्रमुख पक्ष आजवर निवडणुकीच्या रिंगणात कधीच नव्हते. त्यात पुन्हा तिसरी आघाडी. शिवाय, वंचित बहुजन आघाडी, मनसे, एमआयएम असे महत्त्वाचे पक्ष. कोण कोणाच्या विरोधात आहे आणि कोण कोणत्या पक्षात आहे, हे समजू नये, एवढा कोलाहल या निवडणुकीत होतं. त्यामुळे राज्यस्तरावर असे कोणतेही ङ्गनॅरेटिव्हफ तयार होऊ शकले नाही. मराठवाड्यातील जरांगे आंदोलनाचा परिणाम, ओबीसी राजकारणाला मिळालेला आकार आणि प्रामुख्याने विदर्भ–मराठवाड्यातील सोयाबीनचा मुद्दा वगळता निवडणूक स्थानिक संदर्भातच लढवली गेली. सगळीकडे ङ्गलाडकी बहीणफ तर दिसलीच आणि महिलांच्या मतांचा टक्काही वाढला. एकूण काय, ही महाराष्ट्राची निवडणूक नव्हती, तर २८८ स्वतंत्र लढती पाहायला मिळाल्या. सगळीकडे होणारे मतांचे विभाजन एवढे जाणवत होते की अनेक ठिकाणी अगदी काट्याची टक्कर असणार, हे स्पष्ट आहे. बेय़ाच नेत्यांच्या अस्तित्वाची ही लढाई आहे. देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, अजित पवार असोत की, शरद पवार वा उद्धव ठाकरे! या निवडणुकीने या नेत्यांचे राजकारण वेगळे वळण घेणार आहे. उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रात बंद झाले, असे म्हणण्याची प्रथा आहे. खरे सांगायचे तर, महाराष्ट्राचे भवितव्य आज ठरणार आहे. ङ्गमहाराष्ट्राविना राष्ट्रगाडा न चालेफ अशा महाराष्ट्राच्या या निकालावर देशाच्या राजकारणाची फेरमांडणी अवलंबून आहे!

# पंतप्रधान नेतान्याहू यांना अटक आंतरराष्ट्रीय न्यायालयाने जारी केले वॉरंट!

आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाने गुरुवारी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू आणि माजी संरक्षण मंत्री योव गॅलांट यांच्यावर युद्ध आणि मानवतेविरुद्धच्या गुन्ह्यांबद्दल अटक वॉरंट जारी केले. आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाने (खउउ) गुरुवारी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू आणि माजी संरक्षण मंत्री योव गॅलांट यांच्यावर युद्ध आणि मानवतेविरुद्धच्या गुन्ह्यांबद्दल अटक वॉरंट जारी केले. खउउ ने नेतान्याहू आणि गॅलेंट यांच्यावर खून, छळ आणि अमानवी ीळिाश ाळपळींशी छ्शींूरपर्हीं कृत्यांसह मानवतेविरुद्धच्या गुन्ह्यांचा आरोप लावला. इस्त्राईलने गाझामधील नागरिकांना अन्न, पाणी आणि वैद्यकीय मदत यासारख्या अत्यावश्यक पुरवठा प्रतिबंधित केल्याचा आरोप आहे, ज्यामुळे मुलांचा मृत्यू झाला आणि अनेकांना त्रास झाला. माहितीनुसार, आरोपात असे म्हटले आहे की नेतन्याहू यांनी जाणूनबुजून नागरिकांना लक्ष्य केले आणि आवश्यक मदत रोखली यावर विश्वास ठेवण्यासाठी न्यायालयाने वाजवी कारणे शोधली आहेत. त्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला.न्यायालयाने म्हटले की, मआम्ही असे मानतो की नेतन्याहू आणि गॅलंट हे गाझामधील नागरी लोकांवर जाणीवपूर्वक हल्ले करण्याच्या युद्ध गुन्ह्यासाठी जबाबदार आहेत यावर विश्वास ठेवण्यासाठी वाजवी कारणे आहेत. हमासने वाटाघाटी करण्यास नकार दिला दुसरीकडे,





हमासचे ीळिाश ाळपळींशी छ्शींूरपर्हीं कार्यवाह गाझा प्रमुख खलील अल–हय्या यांनी बुधवारी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की पॅलेस्टिनी प्रदेशातील युद्ध संपेपर्यंत इस्रायलशी कैद्यांची देवाणघेवाण होणार नाही. युद्ध संपल्याशिवाय कैद्यांची देवाणघेवाण होऊ शकत नाही, असे हय्या यांनी अल–अक्सा टेलिव्हिजन वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत सांगितले. गाझामधील युद्धविरामासाठी वाटाघाटी करण्याचे प्रयत्न थांबले आहेत आणि अमेरिकेने बुधवारी बिनशर्त कायमस्वरूपी युद्धविरामाची मागणी करणाऱ्या संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या ठरावाला व्हेटो केला. वॉशिंग्टनच्या यूएन राजदूत म्हणाले की अमेरिका युद्धविरामाचा एक भाग म्हणून इस्रायली ओलीसांची तात्काळ सुटका करण्याचा मार्ग मोकळा करणाऱ्या ठरावालाच पाठिंबा देईल.

# यशस्वी चव्हाणला रौप्यपदक ,कार्तिकी मिसाळ ला कास्यपदक कर्नाटक मध्ये राष्ट्रीय खेलो इंडिया लीग तायक्कांदो स्पर्धा संपन्न

बीड। प्रतिनिधी कर्नाटक मध्ये भारत सरकारच्या मान्यतेने पार पडलेल्या राष्ट्रीय खेलो इंडिया अस्मिता वुमेन्स लीग तायक्कांदो स्पर्धेत बीडच्या कु.नयन बारगजे हीने सुवर्णपदक पटकावले आहे. हे तीचे ६ वे राष्ट्रीय सुवर्णपदक आहे . बीडच्या राष्ट्रीय खेळाडू यशस्वी चव्हाण हिने रौप्य पदक तर कार्तिकी मिसाळ हीने कांस्यपदक जिंकले आहे , अशी माहिती राष्ट्रीय प्रशिक्षक डॉ. अविनाश बारगजे यांनी दिली. तायक्कांदो हा ऑलिम्पिक क्रीडा प्रकार असून शालेय क्रीडा स्पर्धा , विद्यापीठ क्रीडा स्पर्धा, राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, पोलीस क्रीडा स्पर्धा अशा शासकीय स्पर्धांसोबतच आता अस्मिता खेलो इंडिया वुमन्स लीग मध्येही तायक्कांदो खेळाचा मागील २ वर्षीपासून समावेश झाला आहे. तायक्कांदो फेडरेशन ऑफ इंडिया या अधिकृत राष्ट्रीय संघटनेकडे या ङ्ग खेलो इंडिया म तायक्कांदो स्पर्धेची तांत्रिक जबाबदारी शासनाकडून देण्यात आली आहे. बीड जिल्ह्यातील खेळाडूंनी नेहमीच राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर देखील आपली वेगळी ओळख निर्माण केलेली आहे . यावर्षी बीडची आंतरराष्ट्रीय खेळाडू कुमारी नयन अविनाश बारगजे हिने वरिष्ठ गटात ५३ किलो वजनात सुवर्णपदक पटकावले. तीने अंतिम







सामन्यात यजमान कर्नाटक ची आंतरराष्ट्रीय खेळाडू परप्पा हीचा १४–४ , १२–१ अशा सरळ २ सेट मध्ये पराभव केला. बीडची दुसरी राष्ट्रीय खेळाडू यशस्वी जितेंद्र चव्हाण हिने जुनिअर वयोगटातील ४४ गटात रौप्यपदक तर कार्तिकी संदीप मिसाळ हिने कॅडेट गटात ५८ किलो वजनात कांस्यपदक जिंकले आहे. महाराष्ट्र संघातील खेळाडूंनी या खेलो इंडिया स्पर्धेत सर्वोत्तम कामगिरी नोंदवली आहे. या स्पर्धेत प्रवीण सोनकुल( पुणे) व अमोल तोडणकर यांनी महाराष्ट्र संघ प्रशिक्षक म्हणून उत्कृष्ट काम केले. हे सर्व खेळाडू तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र संघटनेचे अध्यक्ष डॉ. अविनाश बारगजे व महिला प्रशिक्षिका जया बारगजे यांच्या बीड जिल्हा स्टेडियम येथील तायक्कांदो प्रशिक्षण केंद्रातील खेळाडू आहेत. खेलो इंडिया स्पर्धेत पदके जिंकल्याबद्दल डॉ. योगेशभैय्या क्षीरसागर , डॉ. सारिकाताई क्षीरसागर , जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर , योगेश करांडे, अनिकेत काळे, जितू अर्क, जिल्हा संघटनेचे अध्यक्ष नितीनचंद्र कोटेचा, दिनकर चौरे , बन्सी राऊत , भारत पांचाळ , डॉ. विनोदचंद्र पवार , मणेश बनकर, प्रसाद साहू , बालाजी कराड, नितीन आंधळे यांच्यासह सर्व वरिष्ठ राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडू आदींनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# मुलांना लागला मोबाईलचा लळा

अंबाजोगाई । प्रतिनिधी पुर्वी विद्यार्थी शिक्षक व पालकाच्या अनुभवाने अभ्यासात हुशार होता. आज त्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता एकदम कमी दिसुन येत आहे. याचे कारण शोधले तर गेल्या दोन पालकांनी स्वतः ला महागडे मोबाईल आणले. परंतु मुले ते मोबाईल घेऊन वेगवेगळे खेळण्याचे गेम, युटयुब पाहणे, तासनतास मोबाईल पाहणे ह्या गोष्टी सुरू झाल्या आणि पालकांचे दुर्लक्ष झाले घेतला तरी पालक काही म्हणत नव्हते घरी आल्यावर पहिल्यांदा मोबाईल पाहतात जमल तरथोडा अभ्यास करतात आणि तासनतास मोबाईल घेऊन पाह–तात. पालक संतापतात याचा परिणाम म्हणजे मोबाईल नाही दिला तर जेवण न करणे, रुसुन बसने, उलटे बोलणे. एवढ्यावर नाही मुले घरातच राहु लागली. मोबाईल मिळाला नाही तर तर काही मुले घर सोडुन जाण्याच्या धमक्याही देतात. मग आई वडीलांनी करायचे काय हा मोठा प्रश्न आहे शिक्षणाचे तर विचारणेच नको एवढे महागडे झाले आहे की गोरगरीबांना शिक्षण घेण फार अवघड झाले आहे.परंतु मोबाईलच्या अति वापरामुळे आताची पिढी ही शिक्षणात पुढे राहणे, निरोगी राहणे महत्वाचे होते. पण ती शिक्षणातून बाहेर पडताना दिसत आहे. हे सर्व विद्यार्थ्याला कळाले पाहीजे मोबाईल काय कधिही घेता येईल असे सर्व पालक समजून सांगतात पणआजच्या युगात मोबा–ईलचा लळा असलेले अशिक्षित विद्यार्थी शाळेत असतात पण घरी आले की त्यांच जगण म्हणजे मोबाईल आहे, असें म्हटले तर वावगे ठरणार नाही.

# वाढलेली थंडी रब्बी हंगामातील पिकास पोषक गहु हरभरा मका ऊस लागवड करताना योग्य च

प्रतिनिधी मागील काही दिवसापासून आणि येत्या काही दिवसांमध्ये तालुक्यात जिल्ह्यात देशासह राज्यात थंडीचा कडाका वाढलेला असून याच वाढलेल्या थंडीपासून सध्या रब्बी हंगामामध्येगेल्या पिकाला अतिशय पोषक अशी ठरत असून त्यामुळे गहू हरभरा मका ऊस अधिक पिकासाठी ही थंडी अतिशय वरदान ठरत असून त्यामुळे रात्रीतून व सकाळी काही वेळात गारठ्याचे प्रमाण वाढलेला आहे थंडीपासून पूरक असे वातावरण राहत असल्याने महाराष्ट्रात शितल लहरी मध्ये अडथळे आणणारे कोणतेही घटक सक्रिय नसल्याने गुलाबी थंडी बरोबरच कडाक्याच्या थंडीचे वातावरणामध्ये बदल झाल्यावर होऊ शकते कारण त्यातच आकाश निराभ्र असल्यामुळे बाहेरच्या इतर राज्यात हवेच्या उच्च दावामुळे हे वातावरण वाढू शकते. हवामान विभागाच्या माहितीनुसार हिमालय क्षेत्र असे उत्तर भारतात



पश्चिम विभाजक असतात एक तीव्र थंड हवेचा ज्योत सक्रिय असल्यामुळे उत्तर भारतात थंडी वाढली आहे याच उत्तर भारतीय राज्यांमधून येणाऱ्या वाऱ्यामुळे राज्यभरात थंडीचे प्रमाण वाढण्याचे संकेत मिळत असल्याने राज्याच्या किनारपट्टी क्षेत्रामध्ये वातावरणात बदल झाले असून किमान आणि कमाल तापमानात घट होताना दिसत आहे . गेवराई तालुक्यातील काही शेतकऱ्यांनी कपाशीची लागवड केली होती आता ती कपाशी उपटून काढून टाकून त्या जागेवर गहू हरभरा मका किंवा ऊस या रब्बीत होणाऱ्या पिकांची लागवड करताना शेतकरी दिसत आहे तर मागील दसरा दिवाळीच्या काळामध्ये पावसाचा उसंत थांबल्यावर काही शेतकऱ्यांनी इतर पिके मोडत त्या जागेवर गव्हाची पेरणी केली असता आता तो गहू चांगल्या प्रकारे उगवण होऊन रुपणी साल असल्याने खुरपणी करून योग्य वेळी योग्यरीत्या पाण्याची सोय करून गहू एकदम जोमात आल्याचे काही परिसरातील चित्र दिसत असून सध्या हरभऱ्याला सुद्धा फुले आणि घाटे येण्याची संकेत दिसत आहेत या पिकांना ही पडलेली थंडी अतिशय उपयुक्त ठरत असून आता घरात काढून ठेवलेले स्वेटर मफलर कान टोपी बाहेरनिघू लागली आहे कारण काही दिवसापासून वीहिर बोरला भरपूर प्रमाणात पाणी असल्याने रब्बी हंगामाबरोबर उसाचे क्षेत्र सुद्धा वाढणार असल्याने सध्या काही शेतकरी ऊस लागवड करत आहेत आणि रात्रीच्या वेळेस विज असल्याने कडाक्याच्या थंडीत तेरी दाबण्याचे कामाचा धडाका सुरू असून ही थंडी सुद्धा ऊस लागवडीसाठी एक पोषक ठरत आहे.

# खाद्यतेल दरवाढीने गृहिणींचे बजेट बिघडल



चाकूर । प्रतिनिधी खाद्यतेलाच्या दरवाढीने गृहिणींचे बजेट बिघडले आहे. महागाईच्या झळा तीव्र झाल्याचा याचा फटका सामान्य नागरिकांना बसू लागाल आहे. राज्यातील लाखो महिलांना ग्रामीण तथा शहरी भागात रोजगाराची वानवा आहे. त्यात महागाईच्या झळा तीव्र झाल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. या महागाईमुळे ऐन दिवाळीच्या सणात हात आखडता घ्यावा लागाला आहे. सणाच्या कालावधीत दरवाढीने सर्वसामान्य गृहिणीचे बजेट पुरते कोलमडले होते. परिणामी, सण साजरा करताना हात आखडता घ्यावा लागणार आहे. सणांच्या तोंडावर खाद्यतेलाच्या बाजारात तेजी निर्माण झाली होती. केंद्र सरकारने कच्च्या तेलावरील आयात शुल्क वाढविल्याने खाद्यतेलाच्या किमतीही वाढल्या आहेत. सर्वाधिक वापरले जाणारे सोयाबीन तेल तथा इतरही खाद्यतेलाचे भाव लिटरमागे ३५ रुपयांनी वधारल्याचे पाहायला मिळत आहे. या महागाईत होरपळणा–या सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने गतवर्षी कच्च्या तेलावरील आयात शुल्क रद्द केले होते. त्यामुळे गगनाला भिडणा–याा खाद्यतेलाच्या किमती काही अंशी घसरल्याने गृहिणींसह हॉटेलचालकांना दिलासा मिळाला होता. जवळपास वर्षभरापासून खाद्यतेलाच्या किमती स्थिर होत्याही मात्र, दरवर्षी सणांच्या कालावधीत तेलाची मागणी प्रचंड वाढते. त्यामुळे तेल बाजारात तेजी येते. यावर्षी दिवाळी सणाच्या तोंडावर केंद्राने कच्च्या सोयाबीनवरील आयात शुल्क २० टक्क्यांनी वाढविल्याने त्यामुळे खाद्यतेलाच्या किमती वाढल्या आहेत. यामुळे शेतकरी, महिला, हॉटेलचालक यांच्यासह सर्वसामान्यांचे आर्थिक गणित बिघडले आहे. सरकारने एका हाताने दिले आणि दुस–या हाताने परत घेतल्याची चर्चा जनतेच्या तोंडी रंगू लागली आहेत.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार २४ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# बीड जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदार संघाचा निवडणूक निकाल घोषित

बीड-प्रतिनिधी

बीड, दिनांक 23 : बीड जिल्ह्यातील सहाही विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीचा निकाल आज संबंधित मतदार संघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी यांनी घोषित केला. 228-गेवराई मतदार संघातून विजयसिंह पंडित, 229-माजलगाव मतदार संघातून प्रकाश सोळंके, 230-बीड मतदार संघातून संदीप क्षीरसागर, 231- आष्टी मतदार संघातून सुरेश धस, 232-केज मतदार संघातून नमिता मुंदडा, 233- परळी मतदार संघातून धनंजय मुंडे निवडून आल्याचे संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांनी घोषित केले.

****








# कराड चे ज्येष्ठ लेखक कवी विनायकराव जाधव साहित्य संमेलनाचे संमेलनाध्यक्ष पद भूषविणार

मराठी साहित्य मंडळ या प्रख्यात संस्थेतर्फे सातारा जिल्ह्यामधील कोरेगाव शहरामध्ये आठवे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन रविवर दिनांक २४ नोव्हेंबर २४ रोजी सकाळी दहा वाजता आयोजित केले आहे या संमेलनाचे उद घटन नांदेड येथील ज्येष्ठ लेखक डॉ घनश्याम पांचाळ हे करणार असून कराड येथील ज्येष्ठ लेखक कवी डॉ विनायकराव जाधव संमेलनाचे अध्यक्षा पद भूषविणरे आहेत तर म सा म चे कोरेगाव तालुका अध्यक्ष, चित्रपट दिग्दर्शक अमोल भुजबळ हे स्वागताध्यक्ष पदी उपस्थित राहून सर्व मान्यवरांचे स्वागत करणार आहेत, नाशिक येथील ज्येष्ठ कवयित्री ललिता गवांदे, कोल्हापूर येथील ज्येष्ठ कवयित्री रेखा दीक्षित, मावळते अध्यक्ष कराड येथील ज्येष्ठ कवी सुरेश लोहार मुख्य अतिथी म्हणून तर महाराष्ट्राला सुपरिचित असलेले ज्येष्ठ साहित्यिक डॉ जयप्रकाश घुमटकर उर्फ कवी गोलघुमट हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत, हे विशेष होय याच संमेलनाला सातारा जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष शिवाजीराव महाडिक, रहिमतपूर चे प्राचार्य अनिल बोधे, मुंबई महानगर चे प्रदेश अध्यक्षा सिध्दार्थ कुलकर्णी , म्हसवड शहराचे अध्यक्ष महादेव सरतापेआदी मान्यवर सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत, दुपारच्या सत्रातअभिजात मराठी भाषेची भविष्यातील दिशा आणि दशा यावर परिसंवाद होणार असून त्याचे अध्यक्ष पद अलिबाग रायगड येथील ज्येष्ठ लेखक राजेश थळकर उपस्थित राहणार असून कोल्हापूरच्या सुनंदा बागडे या प्रमुख वक्त्या आहेत त्यानंतर होणाऱ्या राज्यस्तरीय काव्य संमेलनाचे अध्यक्ष पद कोल्हापूरच्या ज्येष्ठ कवयित्री प्राचार्य रेखा दीक्षित भूषविणार असून सिध्दार्थ कुलकर्णी हे प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करणार आहेत या निमित्ताने काव्य वाचन स्पर्धेसाठी येणाऱ्या प्रथम तीस कवींना स्पर्धेत भाग घेता येणार आहे नंतर आलेल्या कवींना स्पर्धेत भाग घेता येणार नाही मात्र कविता सादर करण्याची संधी मिळणार आहे हे विशेष होय याच संमेलनामध्ये साहित्य मंडळातर्फे देण्यात येणार सर्वात मानाचा आणि अत्यंत प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय सावित्रीबाई फुले शैत्या भूषण पुरस्कार सातारचे ज्येष्ठ साहित्यिक डॉ आ ह साळुंखे यांना प्रदान करण्यात येणार आहे तसेच साडेचारशे ते पाचशे प्रस्तावांमधून फक्त सहा दर्जेदार लेखकांची निवड केली आहे त्यामध्ये सातारा चे सुनील जगन्नाथ जाधव यांना विद्या भूषण तर रहिमत पुर येथील विजय उषा शहाजी कदम यांची समाजभूषण पुरस्कारासाठी निवड झाली अहे वाई सातारा येथील संभाजी रामचंद्र लावांड याना गुराखी कथा संग्रहाला तर रहीमत पूर येथील किरण लक्ष्मण तोडकर सूर्यवंशी यांच्या संघर्षाच्या वाटेवर या कविता संग्रहाला तर सातारा येथील भारती भीमराव झिमरे यांच्या अभ्र निरभ्र या कविता संग्रहाला तसेच सुरेख सुरेश कुलकर्णी यांच्या गुंफण शब्दांची नात्यांची या कविता संग्रहाला राज्य स्तरीय साहित्य भूषण पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे हे विशेष होय या संमेलनाचे आयोजन कोरेगाव तालुका अध्यक्ष अमोल भुजबळ यांनी केले असून तर संयोजन सातारा शहर अध्यक्ष कवयित्री प्रतिभा गजरमल यांनी केले आहे या संमेलनाचे सूत्र स.चालन सुप्रसिद्ध निवेदिका चित्रा बाविस्कर या करणार आहेत तरी साहित्यप्रेमी रसिक प्रेक्षकांनी, लेखकांनी, कवींनी याचा लाभ घ्यावा असे मराठी साहित्य मंडळाने काढलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# अखंड हरिनाम सप्ताह, भागवतकथा व विविध कार्यक्रमाचे आयोजन

बीड येथे रामतिर्थावर प.पू.महायोगी दादामहाराज खडकीकर यांच्या एकोणिसाव्या पुण्यतिथी निमित्त व श्री. विद्यागुरु खडकीकर यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड हरिनाम सप्ताह व विविध धार्मिक कार्यक्रम सोहळा शनिवार दि.२३ नोव्हेंबर पासुन ते शनिवार ३० नोव्हेबर २०२४ पर्यंत आयोजित केला आहे. यामध्ये गुरुचरित्र पारायण व श्रीरामकथा व कीर्तनाचे आयोजन असून दैनिक कार्यक्रमामध्ये पहाटे ४ ते ५ काकडा, ५ ते ६ श्रीविष्णूसहस्त्रनाम, सकाळी ६ ते ७ योगशिबिर, सकाळी ८ ते ११ ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी ८ ते ११ गुरुचरित्र पारायण, ११ ते १२ श्रींच्या समाधीला अभिषेक व आरती, दुपारी २ ते ५ भागवतकथा, सायंकाळी ६ ते ८ हरिपाठ व आरती, रात्री ११ नंतर हरिजागर होईल. भागवतकथा प्रवक्ते हभप भागव-ताचार्य आबादेव महाराज माजलगांवकर यांच्या अमृतवाणीतून सात दिवस भागवत कथा दररोज दुपारी २ ते ५ वा. होईल. या सोहळ्याची सुरुवात भव्य शोभायात्रेने शनिवार दि.२३ नोंव्हेंबर रोजी सकाळी ११:३० वा. विठ्ठल मंदिर ते कथास्थळापर्यंत होईल. दररोज रात्रौ ९ ते ११ या वेळेत खालीलप्रमाणे कीर्तनाचे कार्यक्रम होतील. दैनिक योगशिबिर दररोज सकाळी ६ ते ७ वा श्रीराम लाखे, एस.आर. ढोरमारे, डॉ.काकाडे, उबाळे व सह-कारी यांच्या मार्गदर्शनाखाली होईल. शनिवार दि.२३ नोव्हेंबर रोजी हभप. राधाबाई साळुंके. रविवार दि.२४ रोजी हभप तुकाराम महाराज करंडे, सोमवार दि.२५ रोजी बालकीर्तनकार हभप सोहम सातपुते. मंगळवार दि. २६ रोजी हभप सुधाकर महाराज राऊत. बुधवार दि. २७ रोजी हभप सुर्यकांत महाराज पुरुषोत्तमपुरीकर. गुरुवार दि.२८ रोजी हभप एकनाथ महाराज पुजारी. शुक्रवार दि.२९ रोजी हभप अनिल महाराज जोशी. यांची कीर्तनसेवा होईल. सकाळी ११ ते १:३० श्री. रामेश्वर बाहेती व सहकारी गेवराईकर यांचे सुंदरकांड होईल. सप्ताहाची समाप्ती शनिवार दि.३० नोव्हेंबर रोजी सकाळी ७ वा श्रीं च्या समाधीस महारुद्राभिषेक होऊन सकाळी ११:३० ते १:३० या वेळी हभप ज्ञानेश्वर महाराज माऊली माजलगांवकर यांचे अमृतुल्य काल्याचे कीर्तन होऊन त्यानंतर महाप्रसाद दु.२ ते ५ या वेळेत होईल. तरी सर्व भाविक भक्तांनी भागवतकथा, कीर्तन श्रवण व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन प.पू.महायोगी दादामहाराज खडकीकर साधकभक्त परिवारातर्फे श्री. विद्यागुरु खडकीकर महाराज यांनी केले आहे.

# रबरी गतिरोधके अपघाताला निमंत्रण, लोखंडी नट बोल्ट उघडे पडल्याने अपघाताचा धोका : डॉ.ढवळे

बीड शहरांतर्गत नव्याने तयार करण्यात आ-लेल्या धुळे ते सोलापूर सिमेंट काँक्रीट राष्ट्रीय महामार्गावरील वर्दळीच्या ठिकाणी असण-ारी अपघात प्रवण क्षेत्र असणारी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक, पोलिस अधीक्षक कार्यालय तसेच जिल्हा रुग्णालय याठिकाणी रस्ता क्रॉसींग असुन या ठिकाणी बसविण्यात आलेली रंबल स्ट्रीप (रबरी गतिरोधके) दुरा-वस्थेत असुन तुटल्याने रबर उडुन गेल्याने ग-ितरोधकाचे लोखंडी नट बोल्ट उघडे पडले असुन त्यामुळे वाहनांचे टायर पंक्चर होऊन अथवा फुटुन अपघाताचा धोका वाढला असुन तातडीने नविन रंबल स्ट्रीप (रबरी गतिरोधक) बसविण्यात यावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी नितिन गडकरी, प्रकल्प संचालक तथा व्यवस्थापक राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण छत्रपती संभाजीन-गर,कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग बीड, जिल्हाधिकारी बीड, पोलिस अधीक्षक बीड यांना लेखी निवेदनाद्वारे केली असुन आठवडाभरात नविन गतिरोधक न बसवल्यास दि.०२ सोमवार रोजी पोलिस अधीक्षक कार्यालयासमोर रास्ता रोको आंदोलन करण्याचा ईशारा दिला आहे.



अपघात प्रवण क्षेत्र असलेल्या ठिकाणी ना-गरीकांकडुन गतिरोधक बसविण्याची मागणी करण्यात येते त्याठिकाणी नागरीकांचा रोष कमी करण्यासाठी उपाययोजना म्हणून गतिरोधक बसविण्यात येतात.मात्र त्याची नंतर देखभाल करण्यात येत नसुन आता हेच गतिरोधक अपघ-ातांना कारणीभूत ठरत असुन रबरी गतिरोधक तुटल्याने रबर उडुन गेल्याने उघडे पडलेल्या लोखंडी नट बोल्ट मुळे वाहनांचे टायर पंक्-चर अथवा फुटून अपघात होत आहेत. त्यामुळे तातडीने नविन गतिरोधक बसविण्यात यावीत अशी मागणी करण्यात आली आहे.गेल्यावर्षी ४ ऑक्टोबर २०२३ रोजी बीड शहरांतर्गत अपघात प्रवण क्षेत्र असलेल्या जिल्हा रुग्णालय क्रॉसिंग ,पोलीस अधीक्षक कार्यालय समोर , लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकामध्ये रबरी गतिरोधकां-चे रबर रबर उडुन केवळ लोखंडी नट बोल्ट शिल्लक राहिल्याने वाहनधारकांना त्रास होत होता त्याचबरोबर वाहनांचे टायर फुटुन अपघाताचा धोका वाढला होता.संबधित प्रकरणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी लेखी निवेदनाद्वारे तत्कालीन पोलीस अधीक्षक बीड नंदकुमार ठाकूर यांना दि.९ ऑक्टोबर रोजी रास्तारोको आंदोलनाचा ईशारा दिल्यानंतर याची

# आ.संदिप क्षीरसागर विजयी ; लिंबागणेशकरांचा जल्लोष



- -


लिंबागणेश:- ( दि.२३ ) राज्यभरात महायुतीचा गाजावाजा होत असला तरी बीड विधानसभा मतदारसंघातुन आ.संदिप क्षीरसागर विजयी झाले असुन बालाघाटावरील मतदारांनी संदिप क्षीरसागर यांना मताधिक्य दिले असुन विजयी झाल्यानंतर लिंबागणेश येथे शिवतीर्थ याठिकाणी आतिशबाजी करत घोषणाबाजी करत जल्लोष साजरा केला.संपुर्ण बालाघाट तुतारीमय झाला आहे. यावेळी विक्की वाणी, प्रमोद रणखांब, अँड.गणेश वाणी,अक्षय वाणी,बाळासाहेब मोरे, प्रकाश जाधव,अशोक वाणी,अक्षय वाणी, महावीर वाणी, सुभाष वाणी, महेश ढास, राजेंद्र ढास, विजय थोरात,विजय आगवान, गणेश मुळे, पोखरीचे सरपंच बिभिषण मुळीक, चव्हाण वाडा सरपंच योगेश चव्हाण, पिंपरनई उपसरपंच बबन मोहिते, आदि उपस्थित होते.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
रविवार २४ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# शेर तो आ गया हैः.; निवडणूक जिंकताच छगन भुजबळ काय म्हणाले?

नाशिकच्या येवला मतदारसंघातील निकालाकडे सर्वांचं लक्ष होतं. 26 हजार 681 मतांनी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे छगन भुजबळ विजयी झाले आहेत. तर शरद पवार गटाचे माणिकराव शिंदे यांचा पराभव झालेला आहे. विजयानंतर फटाक्यांची आतषबाजी, ढोल ताशाच्या गजरात भुजबळांच्या विजयाचा जल्लोष केला आहे. जेसीबीतून छगन भुजबळांना हार घातला गेला आहे. फुलांची देखील उधळण करण्यात आली आहे. भुजबळ समर्थकांचा येवल्यातील भुजबळांच्या संपर्क कार्यालयाबाहेर आनंदोत्सव पाहायला मिळत आहे. ओपन जीपमधून भुजबळांच्या विजयाची रॅली काढण्यात येत आहे. यावेळी भुजबळांनी संबोधित केलं. शायरी बाद मैं करेंगे, शेर तो आ गया है, असं यावेळी भुजबळ म्हणाले. महायुतीचे नेते देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित दादा पवार यांनी चांगले निर्णय घेतले. त्याचा परिणाम या निवडणुकीत झाला आहे. आमच्या लाडक्या बहिणींनी ही निवडणूक जिंकवली, असं छगन भुजबळ म्हणालेत. येवल्यात आम्हाला 55 56 हजारांचे मताधिक्य मिळायचे. आमचं मताधिक्य घटले, आमचे मित्र जातिवादाचा प्रचार केला, असं म्हणत भुजबळांनी जरांगेंना



टोला लगावला आहे. भाजपसह इतर पक्षांनी जाणीवपूर्वक लक्ष घातले, 28 हजार काय विजय हा विजय असतो. विकासाचे आणि मागासवर्गीयांचे संरक्षण करण्याचे काम मी सुरूच ठेवणार आहे. मुस्लिम धर्माच्या लोकांनी इथं येऊन माझ्यासाठी आवाहन केलं. लाडक्या बहिणींमुळे विजय प्राप्त झाला. माझ्या सोबत काही आले त्यांना त्रास झाला, शारीरिक त्रास झाला तरी सोबत राहिले.

## छगन भुजबळ काय म्हणाले?

महाराष्ट्रात जातीवादाला थारा नाही, लोकांनी इभ्रत आमची राखली. दलित, ओबीसी आणि मुस्लिम समाज पाठीमागे उभे राहिले. मराठा समाजाच्या मराठा नेत्यांनी प्रचंड मेहनत घेतली. त्यांना थोडेफार यश मिळाले, अधिक यश मिळाले नाही. स्वकियांसोबत त्यांना अडचणी आल्या. नातेसंबंध अडचणी आल्या पण ते मागे हटले नाहीत. वाईट वाटले, प्रचंड विकासाचे कामे झाले होते. त्या विकासासाठी त्रासले होते ते जातीवादाला थारा न लागू देत उभे राहतील असे वाटले होते पण थोडेफार लोक सोबत राहिले, असं छगन भुजबळ यांनी म्हटलं आहे.

फडणवीस यांच्यावर आमचे मित्र आग ओकत होते. फडणवीस यांना शिव्या घालत होते, भाजप महाराष्ट्रात कधीही इतक्या जागा मिळाल्या नाही, त्या मिळाल्या, असं भुजबळ म्हणाले.

# कार्तिकी पायवारी श्री क्षेत्र पंढरपूर ते श्री क्षेत्र आळंदी पायवारी . दिवे घाटातील काही क्षणचित्रे.

भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम. मंगळवार दिनांक १२ नोव्हेंबर २०२४ रोजी श्री क्षेत्र पंढरपूर येथील कार्तिकी एकादशी दिवशी कार्तिकी यात्रा मोठ्या प्रमाणात भरते, त्या यात्रेची सांगता शुक्रवार दिनांक १५ नोव्हेंबर २०२४ रोजी गोपाळपूर येथील पौर्णिमेच्या काल्याने संपन्न झाली.आणि त्याच दिवशी श्री क्षेत्र पंढरपूर हून श्री क्षेत्र आळंदी कडे वारकऱ्यांची पायवारी सुरू झाली. श्रीक्षेत्र पंढरपूर भंडीशेगांव,तोंडले बोंडले, वेळापूर,खुडूस,पुरंदावडे शाळा, नातेपुते, धर्म पुरी,बरड पेट्रोल पंप,विडवणी,निबोरे, तरडगाव,निरा कनल,कामटवाडी, जेजुरी,सासवड मळा, सासवड, दिवे घाट,वडकीनाका, हडपसर, विश्रांतवाडी, आणि श्री क्षेत्र आळंदी असा कार्तिकी पायवारीचा प्रवास सालाबादप्रमाणे यंदाही संपन्न होत आहे.मंगळवार दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी माऊलीच्या श्रीक्षेत्र आळंदी येथे मोठी कार्तिकी यात्रा भरत आहे. या पंढरपूर ते आळंदी पायवारीत श्री.सद् गुरु वै.ह.भ.प.आप्पासाहेब वासकर महाराज फड या मधील वारकरी बांधव मोठ्या प्रमाणात सहभागी झालेले होते.या फडा मध्ये मुंबई कांदिवली येथील धनगर समाज विकास मंडळातील जवळजवळ ३५ ते ४० वारकरी बांधव सहभागी झाले आहेत.अभंग, गौळण,भारुड टाळ मृदुंग सोबत वारकरी गात वाजवत तल्लीन होऊन देहभान विसरून पायवारीत सहभागी झाले होते.





| वार | दिनांक | तिथी | नाष्टा | दुपार जेवण | मुक्काम |
|---|---|---|---|---|---|
| शुक्रवार | १५ नोव्हेंबर २०२४ | पौर्णिमा | - | प्रस्थान दुपारी १ वाजता | भंडीशेगाव |
| शनिवार | १६ नोव्हेंबर २०२४ | प्रतिपदा | तोंडले-बोंडले | वेळापूर | खुडूस |
| रविवार | १७ नोव्हेंबर २०२४ | द्वितीया | पुरंदावडे शाळा | नातेपुते | धर्मपुरी |
| सोमवार | १८ नोव्हेंबर २०२४ | तृतीया | बरड पेट्रोल पंप | विडणी | निबोरे |
| मंगळवार | १९ नोव्हेंबर २०२४ | चतुर्थी | तरडगाव | निरा कॅनल | कामटवाडी |
| बुधवार | २० नोव्हेंबर २०२४ | पंचमी | जेजूरी | सासवड मळा | सासवड |
| गुरुवार | २१ नोव्हेंबर २०२४ | षष्ठी | दिवेघाट | वडकीनाला | हडपसर |
| शुक्रवार | २२ नोव्हेंबर २०२४ | सप्तमी | विश्रांतवाडी | आळंदी | आळंदी |



# विजयी होताच आमदारानं मानले जरांगे पाटलांचे आभार, म्हणाले विजयात मोठा वाटा





विधानसभा निवडणुकीचे निकाल हाती आले आहेत. राज्यात 231 जागांसह महायुतीला मोठं यश मिळालं आहे. भाजप 131 जागांसह सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. शिवसेना शिंदे गटाला 57 जागा मिळाल्या आहेत, तर राष्ट्रवादी अजित पवार गटानं देखील मोठी मुसंडी मारल्याचं पहायला मिळत आहे. अजित पवार गटाला राज्यात 41 जागा मिळाल्या आहेत. मात्र दुसरीकडे महाविकास आघाडीला पराभवाचा मोठा धक्का बसला आहे. महाविकास आघाडीचे राज्यात फक्त 45 जागा आल्या आहेत. ज्यामध्ये शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या सर्वाधिक 20 जागा, काँग्रेसच्या 15 जागा तर राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या सर्वात कमी 10 जागा आल्या आहेत. मराठवाड्यात मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांच्या आंदोलनाचा प्रभाव राहिल, त्याचा फटका हा महाविकास आघाडीला बसेल असा अंदाज वर्तवण्यात येत होता. मात्र मराठवाड्यात मतदारांनी देखील महायुतीच्याच बाजुनं कौल दिला आहे. मराठवाड्यात देखील महायुतीला मोठं यश मिळालं आहे. दरम्यान बीडमध्ये मात्र राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या संदीप क्षीरसागर यांनी आपला गड राखण्यात यश मिळवलं आहे. विजय होताच त्यांनी मनोज जरांगे पाटील यांचे आभार मानले आहेत

## नेमकं काय म्हणाले संदीप क्षीरसागर?

विजय होताच संदीप क्षीरसागर यांनी मनोज जरांगे पाटील यांचे आभार मानले आहेत. त्यांनी आपल्या विजयाचं श्रेय मनोज जरांगे पाटील यांना दिलं आहे. माझ्या विजयामध्ये मनोज जरांगे पाटील यांचा मोठा वाटा आहे. मी मनोज जरांगे पाटील यांची भेट घेणार आहे. मी उद्या शरद पवार साहेब यांची देखील भेट घेणार आहे. मुस्लिम समाजाचे धर्मगुरू नेमानी यांची देखील मी मुंबईमध्ये भेट घेणार आहे. एकनिष्ठतेला किंमत देऊन पवार साहेबांनी मला उमेदवारी दिली. माझ्या विजयाचं श्रेय बीडच्या जनतेचं देखील आहे, असं संदीप क्षीरसागर यांनी म्हटलं आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com